.. Khandoba Arati ..

॥ खंडोबाची आरती ॥

पंचानन हयवाहन सुरभूषितनीळा ।
खंडामंडित दंडित दानव अवलीळा ॥
मणिमल्लां मर्दुनियां जों धूसुर पिवळा ।
हिरे कंकण बासिंगे सुमनांच्या माळा ॥ १ ॥

जय देव जय देव जय शिव मल्हारी ।
वारीं दुर्जन असुरां भवदुस्तर तारी ॥ धृ ॥

सुरवर संवर वर दे मजलागी देवा ।
नाना नामे गाईन ही तुमची सेवा ॥
अघटित गुण गावया वाटतसे हेवा ।
फणिवर शिणला किती नर पामर केवा ॥ जय ॥ २ ॥

रघुवीरस्मरणी शंकर हृदयीं निवाला ।
तो हा मल्लंतक अवतार झाला ॥
यालागीं आवडे भाव वर्णिला ।
रामी रामदासा जिवलग भेडला ॥ जय ॥ ३ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 27, 1999